**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०१७ मधील नि.क्र.४२ वरील आदेश**

( पारीत दिनांक – २७/०६/२०२३)

भरत सुकूमार चौगुले विरुध्द कै. बाबूराव आण्णाप्पा चौगुले वगैरे.

**CNR -MHKO130009142016**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वि.प. यांच्या कथनानुसार, प्रस्तुत कामी दि. ११/०४/२०२३ रोजी अर्जदाराचा 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे, दि. ११/०४/२०२३ रोजी विना विलंब वि.प. यांनी निशाणी क्र. ४२ ला अर्ज दाखल करुन उलटतपास का घेता आलेला नाही याचा खुलासा केला आहे. अर्जातील संपूर्ण मजकूर खरा असून बरोबर आहे. वस्तुतः वि.प. कोर्टात हजर होता व त्याचदिवशी त्यांनी अर्ज दिलेला आहे व नो क्रॉस सेट असाईड चा अर्ज दिलेला आहे. यावरुन वि.प. यांचा प्रामाणिकपणा स्पष्ट दिसत आहे. वाद हा स्थावर मिळकती संबंधी असल्याने व मूळ अर्जाचा निर्णय गुणदोषावर होणे जरुरीचे असल्याने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** सदर अर्जावरती अर्जदाराने निशाणी क्र. ४२ च्या अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून अर्जदार यांनी दि. १९/०१/२०२२ रोजी पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले होते. सदरची प्रत यातील वि.प. यांनी दि. ०३/०९/२०२२ रोजी घेतलेली होती. तथापि, यातील वि.प. यांनी तद्नंतर अर्जदार यांचा उलटतपास घेतलेला नाही. दि. ११/०४/२०२३ रोजी मे.कोर्टानी 'उलटतपास नाही' चा आदेश पारित केल्यानंतर वि.प. यांनी सेट असाईड करणेबाबत अर्ज दिला आहे. सदर अर्जातील सर्व कथने चुकीची व खोटी आहेत वि.प.हे जाणून–बुजून याकामी विलंब करणेसाठी टाळाटाळ करीत आहेत. तरी, सदर अर्ज नामंजूर करणेत यावा, मंजूर करणेचा झालेस वि.प. यांना अर्ज खर्चासह मंजूर करुन सदर खर्चाची रक्कम अर्जदारास मिळणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

**४.** उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** निर्विवादपणे, वि.प. यांच्याविरुध्द दि. ११/०४/२०२३ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे असे दिसून येते.

प्रस्तुचा सरतपास हा दि. २२/०६/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे असे दिसते. निश्चितपणे, नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, वि.प. यास अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य राहील, तसे न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. सबब, न्यायहितास्तव वि.प. यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ४२) वि.प. ने अर्जदार यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर वि.प. विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.06.27 17:28:16 +0530

कागल. **(अमोल भारत जवळे)**
दिनांक – २७/०६/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.